Symbol of Knowledge || ISBN: 978-81-956658-1-5 || April, 2022



# सिम्बॉल ऑफ नॉलेज


**: संपादक :**

**प्रा. डॉ. उत्तम तुकाराम गायकवाड**

(एम. ए., पीएच. डी.)

सहयोगी प्राध्यापक, भूगोल विभाग प्रमुख,

श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय, लातूर

**प्रा. डॉ. पुरूषोत्तम रामभाऊ मोरे**

(एस्सी., बी. एड., पीएच. डी., बी. एम. सी. जे.)

प्राणीशास्त्र विभाग प्रमुख

कै. रसिका महाविद्यालय देवणी, जि. लातूर



*Rajarshi Publication*

ISBN: 978-81-956658-1-5

Published in April, 2022



IQAC COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Kai. Rasika Mahavidyalaya Deoni Dist. Latur

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | शोधनिबंध / लेख | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | संपादकीय | 01 |
| 1. | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतीकारी कार्य<br>*श्रीमती वंदना आबासाहेब सरवदे* | 36 |
| 2. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जात आणि अस्पृश्यता निवारण विषयक विचार<br>*प्रा. शैलेश कुशेंद्र भालेराव व प्रा.संतोष पंढरीनाथ कारभारी* | 51 |
| 3. | भारतीय राज्यघटनेतीलं बौध्द धर्माचा प्रभाव<br>*प्रा. डॉ. प्रकाश सं.वाघमारे व दुधडे कोमल गणपतराव* | 59 |
| 4. | डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचे आरक्षण विषयक विचार<br>*प्रा.डॉ.अंभोरे अशोक गंगाराम* | 65 |
| 5. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जल आणि विद्युत धोरण<br>*प्रा.डॉ.शिवाजी गाढे* | 69 |
| 6. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार<br>*प्रा.डॉ.शंकरानंद येडले* | 78 |
| 7. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रंथसंपदा<br>*प्रा.डॉ.सिंधू खंदारे* | 84 |
| 8. | ज्ञानोपासक डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>*प्रा.महेंद्र अच्युत आल्टे* | 99 |
| 9. | पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>*मा. प्राचार्य डॉ.हरिचंद्र निर्मळे* | 106 |
| 10. | आधुनिक भारताचे निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>*पुष्कराज प्रल्हाद साबळे* | 133 |
| 11. | डॉ.बाबासासेब आंबेडकर यांचे मराठवाड्याच्या शिक्षणातील योगदान<br>*प्रा.डॉ.यु.टी.गायकवाड* | 140 |


IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Kai. Rasika Mahavidyalaya Deoni Dist. Latur

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

12. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची विकासाविषयीची धारणा 151

*प्रा.डॉ.वी.ए.कांबळे*

13. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी आणि उद्योगा विषयी विचार 157

*प्रा. डॉ.एम.डी .कच्छवे*

14. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान 164

*प्रा. मोहन बाबुराव चव्हाण*

15 डॉ. बाबासाहेब आंबेडकर: एक अर्थतज्ञ 174

*डॉ. सुनिता लिंबराज गुजर*

16. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील विचार 179

*प्रा. पराग मुरलीधर सपाटे*

17. स्त्रियांचे उद्धारकर्ते डॉ. भीमराव रामजी आंबेडकर 192

*प्रा. डॉ. पुरुषोत्तम रामभाऊ मोरे*

IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Kai. Rasika Mahavidyalaya * Deoni * Tq. Deoni Dist. Latur

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

2021-22

Symbol of Knowledge || ISBN: 978-81-956658-1-5 || April, 2022

# 17. स्त्रियांचे उद्धारकर्ते डॉ. भीमराव रामजी आंबेडकर

प्रा. डॉ. पुरुषोत्तम रामभाऊ मोरे
प्राणीशास्त्र विभाग प्रमुख
कै. रसिका महाविद्यालय देवणी जि. लातूर

**प्रस्तावना:**

आज स्त्री सर्वच क्षेत्रात अग्रेसर होत आहेत. आज कुठलेही असे क्षेत्र नाही की, त्यामध्ये स्त्रियाअग्रेसर किंवा अग्रभागी नाहीत. मनुस्मृतीच्या वांझोट्या कायद्यामुळे 'चूल आणि मूल' एवढ्यात गुरफटून असलेली स्त्री, जिला घराचा उंबरठा ही ओलांडण्याची मुभा नव्हती, स्त्रीला घरातील / कारभारातील काही कळत नाही असे हिणवले जायचे, स्त्रीच्या मताला आणि घरातीलनिर्णय घेण्याला सुद्धा कवडीची किंमत नव्हती त्याच स्त्रिया आज देशाच्या राज्यकारभारात सामील होत आहेत. राष्ट्रपती, पंतप्रधान यासारखी उच्च पदे भूषवीत आहेत. ज्या स्त्रियांची दृष्टी सदैव घरातील पुरुषांच्या पायावर खेळलेली असायची त्या आज अंतराळात जाऊन संशोधन करत आहेत. ज्यांच्या स्पर्शाने वेद विटाळत होते त्याच स्त्रिया आज वेद आणि मनुस्मृतीची चिकित्सा करीत आहे. काहीही अपराध नसताना ज्यांच्या पाठीचं धिरड व्हायचं त्या आज आयपीएस होत आहेत.

आज स्त्रियांची प्रत्येक क्षेत्रात होत असलेली उन्नती ही 33 कोटी देवापैकी कुठल्याही देव देवताने उपवास / उपासना किंवा व्रतवैकल्यांना प्रसन्न होऊन दिलेलं वरदान किंवा चमत्कार नव्हे. स्त्रियांची उन्नती ही एका रात्रीतून जादूची कांडी फिरवून झालेली नाही तर त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अपार कष्ट केले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक परिश्रमामुळेच स्त्रियांचा उद्धार झाला आहे हे आजच्या स्त्रियानी विसरता कामा नये.

**स्त्री जीवनाचा पूर्वइतिहास:**



IQAC-COORDINATOR
Kal.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Kal. Rasika Mahavidyalaya * Deoni * Tq. Deoni Dist. Latur

Principal
Kal. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

स्त्रियांची पूर्वीची स्थिती जाणून घेण्यासाठी पूर्व इतिहास जाणून घेणे आवश्यक आहे. प्राचीन काळी स्त्रियांचा सामाजिक दर्जा फार उच्च होता. जगात कोणत्याही देशात स्त्रियांना जेवढा मानसन्मान मिळत नव्हता तेवढा भारतात मिळत होता. अगदी सुरुवातीच्या काळात भारतात मातृसत्ताक पद्धत अस्तित्वात होती. शेती, पशुपालन, वैद्यकीय व्यवसाय, वस्त्रोद्योग, घरबांधणी इत्यादीची सुरुवात नि:संशय स्त्रियांनी केलेली आहे. प्राचीन काळी स्त्रिया स्वावलंबी व वेदाभ्यासात पारंगत होत्या शिवाय ज्ञानार्जनात कमी नव्हत्या. त्यांना स्वमर्जीने पती (स्वयंवर) निवडण्याचा अधिकार होता, घटस्फोट घेण्याचा अधिकार होता, पतीच्या आणि वडिलांच्या संपत्तीत मालकी हक्क होता. त्याकाळी बालविवाहाला, स्त्री भ्रूणहत्येला थारा नव्हता. सर्व स्त्रिया स्वातंत्र्याचा उपभोग घेत होत्या. परंतु पुढे कालांतराने स्त्री स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा प्रयत्न मनुस्मृतिच्या माध्यमातून पुरुष प्रधान संस्कृतीत केला गेला.

असा हा स्त्रियांसाठी सुवर्णकाळ असताना स्त्रियांच स्वातंत्र्य हिरावून बालविवाह, सतीची चाल, जरठ विवाह, विधवांचे शोषण, घटस्फोटास नकार, मालकी हक्कातून बेदखल इत्यादी अनिष्ट रूढी परंपरा निर्माण करून हा सुवर्णकाळ कलंकित काळात कसा रूपांतरित झाला? नंतरच्या काळात स्त्रियांची अवनती झाली ती कोणामुळे? भारतातील समस्त स्त्रियांची ही अवनती होण्याचं कारण पाताळयंत्री मनूच्या लेखणीतून लिहिलेली 'मनुस्मृती' हे आहे. याव्यतिरिक्त या प्रश्नाच दुसर उत्तर नाही. याबद्दल कुणाला शंका येत असेल तर मनुस्मृतीमध्ये स्त्रियांच्या एकंदर जीवनासंबंधी जे धार्मिक कायदे लिहून ठेवले आहेत ते वाचावेत.

**मनुस्मृतीमधील स्त्रियांविषयी कायदे:**

त्यापैकी काही धार्मिक कायदे खालील प्रमाणे आहेत [कंसात अध्याय व श्लोक क्रमांक दिलेला आहे.]



Principal
Kal. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur
Kai. Rasika Mahavidyalaya Deoni Tq. Deoni Dist. Latur
IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

*"ढोल, गंवार, शूद्र, पशु, नारी / ये सब है ताडन के अधिकारी" हा मनुस्मृतीचा गाभा आहे.*

मनुस्मृती हा ग्रंथ बारा अध्यायांचा असून त्याचे 2634 श्लोक आहेत. बापटशास्त्रींचा मराठी अनुवाद पुढे देत आहे. [कंसात अध्याय व श्लोक क्रमांक दिलेला आहे.]

- सहज शृंगार चेष्टेने मोहित करून पुरूषांस दुषित करणे हा स्त्रियांचा स्वभावच आहे. यास्तव ज्ञानी पुरूष स्त्रियांविषयी कधी बेसावध राहात नाहीत. [2/13]
- माता, बहीण व कन्या यांच्या बरोबरही पुरूषाने एकांतात बसू नये. [2/15]
- ज्यांना फक्त मुलीच झालेल्या असतील त्यांच्या मुलींशी लग्नं करू नयेत. [3/8]
- जिला भाऊ नसतील तिच्याशी शहाण्याने विवाह करू नये. [ 3/11]
- नवऱ्याने बायकोसोबत एका ताटात जेवन करू नये. तसेच पत्नीला जेवताना, शिंकताना, जांभई देताना पाहू नये. [4/43]

**मनुस्मृतीने सांगितलेली स्त्रियांचे धर्म:**

- बाल्यावस्थेत मुलीने, तरूण स्त्रीने किंवा वृद्ध बाईनेही घरातील लहानसे कार्यही स्वतंत्रपणे करू नये. [5/47]
- स्त्रीने कधीही स्वतंत्र होऊ नये. [5/48]
- पिता, पती, पुत्र यांच्यावेगळी राहणारी स्त्री दुष्ट झाल्यास आपल्या दोन्हीं कुळांस निंद्य करते. [5/49]
- पती जरी विरूद्ध असला तरी स्त्रिने प्रसन्न मुद्रेने असावे. गृहकर्मामध्ये दक्ष होऊन राहावे. घरातील सर्व भांडी तिने घासून पुसून स्वच्छ ठेवावीत. [5/150]
- लग्नात वधूचे दान केले जाते, त्यामुळे ती पतीच्या मालकीची वस्तू असते हे तिने कायम ध्यानात ठेवावे. [5/152]



IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Principal
Kal. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

Kai. Rasika Mahavidyalaya * Deoni * Tq. Deoni Dist. Latur

- पती सदाचारशून्य असो, तो दुसऱ्या बाईवर प्रेम करीत असो, विद्येने तो गुणशून्य असो, तो कसाही असला तरी पत्नीने त्याची देवाप्रमाणे सतत सेवा करावी. [5/154]
- पतीची सेवा हेच पत्नीचे व्रत होय. तिचा यज्ञ होय. त्याच्या आज्ञेत राहाणे हाच तिचा स्वर्ग होय. [5/155]
- स्त्रियांनी पहिला पती वारला तरी कधीही दुसरा नवरा करू नये" [5/162]
- स्त्रीधर्माप्रमाणे मन, वाणी, देह, यांच्याद्वारे जी आपली पतीची कायम सेवा करते तिलाच स्वर्ग मिळतो. [5/166]
- पहिली पत्नी वारली तर तिचे दहन करून पतीने दुसरे लग्न करावे. [5/168]
- पिता, पती, आप्त यांनी स्त्रियांस सर्वदा आपल्या आधीन ठेवावे. सामान्य विषयांमध्ये त्या आसक्त झाल्यास त्यास आपल्या वश करून घ्यावे. [6/2]
- विवाहाच्या पुर्वी पित्याने, त्यानंतर पतीने, म्हातारपणी पुत्राने तिचे रक्षण करावे. सारांश कोणतीही स्त्री स्वातंत्र्यास पात्र नाही. योग्य नाही. [ 6/3]
- स्त्रीसाठी मद्यपान, दुर्जनसमागम, पतीपासून दूर राहणे, इकडे तिकडे भटकणे, अयोग्य वेळी निजणे, दुसऱ्याच्या घरी राहणे हे सहा व्याभिचारदोष होत. [9/13]
- स्त्रिया सुंदर रूप पाहात नाहीत, त्यांना यौवनादी वयाबद्दल आदर नसतो, पुरूष सुरूप की कुरूप कसाही असला तरी तो पुरूष आहे एवढ्याच कारणाने त्या चा भोग घेतात. [9/14]
- पुरूषाला पाहिल्याबरोबर संभोगाविषयी अभिलासा उत्पन्न होणे हा स्त्रिचा स्वभाव असतो. त्या चंचल असतात. त्या स्वभावत: स्नेहशून्य असतात. [9/15]



Principal
Kal. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

IQAC-COORDINATOR
Kal.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Kal. Rasika Mahavidyalaya Deoni Tq. Deoni Dist. Latur

- स्त्रियांना वेदांचा अधिकार नाही. स्मृतींचा नाही. धर्माचा नाही. त्या धर्मज्ञ बनू शकत नाहीत. त्या अशुभ असतात. [9/18]
- व्याभिचार हाच स्त्रियांचा स्वभाव आहे." [9/19] " नवऱ्याने बायको सोडली किंवा विकली तरी त्याची मालकी कायम राहते. [9/46]

मनुस्मृतीच्या सखोल अभ्यासाअंती असे लक्षात येते की, मनुस्मृतीने स्त्रीजीवनाची संपूर्णता राखरांगोळी केली होती. स्त्री म्हणून जिथे जिथे शोषण करता येईल तसे नियम, कायदे, प्रथा परंपरा मनुस्मृतीमध्ये आहेत. मनुस्मृती नुसार स्त्री म्हणजे केवळ पुरुषांसाठी उपभोगाची वस्तू होती. नवऱ्याने तिला विकलं, तिला मारहाण केली, तिच्यावर कितीही अन्याय अत्याचार केला तरी तिला न्याय मागण्याचा सुद्धा हक्क नव्हता. पशुहूनही तुच्छ जीवन तिचे होते.

मनुस्मृतीमध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, लग्नात वधूचे दान केले जाते त्यामुळे ती पतीच्या मालकीची वस्तू असते हे तिने कायम ध्यानात ठेवावे. पती सदाचारशून्य असो, तो दुसऱ्या बाईवर प्रेम करत असो, तो विद्याने कितीही गुणशून्य असो, कितीही मूर्ख असो तो कसाही असला तरी पत्नीने त्याची देवाप्रमाणे सतत सेवा करावी.

'नारि ताडन की अधिकारी' म्हणून स्त्रीला सदैव नीच स्थान देऊन तिचे हक्क अधिकार नाकारण्यात आले. स्त्री संपूर्णता पुरुषावर अवलंबून असावी, त्याच्या अधीन असावी त्यातच तिचे कल्याण आहे. पती कितीही मूर्ख असो पत्नीने देवाप्रमाने त्याची सेवा करावी हाच तिचा धर्म आहे त्याच्या विरुद्ध कृत्य करणे हे पाप कृत्य आहे. हिंदू स्त्रियांना वटसावित्रीची पूजा, सत्यनारायण, सोळा सोमवार, दिवाळी, दसरा, संक्रात, होळी, वसंत पूजा, गुढीपाडवा, तुळशीचे लग्न, आषाढी एकादशी, भागवत कथा वगैरे मध्ये गुंतवून ठेवले. स्त्रियांना चूलआणि मुल, व्रतवैकल्य या पलीकडे जग नव्हत. काही स्त्रिया आजही यामध्ये गुरफटलेले आहेत.



IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

Kai. Rasika Mahavidyalaya * Deoni * Tq. Deoni Dist. Latur *

पुरुषांच्या अत्याचाराविरुद्ध बंद करण्याचा लढण्याचा अधिकार नव्हता. तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानाने मिळवून दिला.

**महिलांसाठी संविधानिक तरतुदी:**

गुलामाला गुलामीची जाणीव करून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांसाठी संविधानिक मार्गाने पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळवून दिले. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना मान, सन्मान आणि स्वाभिमानाने जीवन जगता यावे यासाठी संविधानामध्ये ज्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्यातील काही पुढीलप्रमाणे आहेत.

संविधानाच्या कलम 14 नुसार कोणत्याही व्यक्तीस आणि कोणत्याही क्षेत्रात कायद्यापुढे समानता आणि कायद्याचे समान संरक्षण नाकारता येणार नाही.

कलम 15 नुसार स्त्रीपुरुष भेदभाव नष्ट केला.

कलम 16 नुसार स्त्रियांना समानतेचा अधिकार बहाल केला.

कलम 17 नुसार महिला व पुरुषां सोबत असलेली अस्पृश्यता नष्ट केली.

कलम 19 नुसार भारतातील सर्व पुरुष आणि स्त्रियांना सुद्धा भाषण स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततेने विना शस्त्र एकत्र जमन्याचे स्वातंत्र्य दिले याशिवाय कोणताही पेशा आचरण्याचा, कोणताही व्यवसाय, व्यापार, धंदा करण्याचा हक्क दिला.

कलम 23 नुसार मानवाचा व्यापार व वेठबिगारीस प्रतिबंध घालण्यात आला आणि याचे उल्लंघन करणे कायद्यानुसार शिक्षा पात्र अपराध ठरविला.

कलम 39 नुसार स्त्री व पुरुष दोघांनाही समान कामासाठी समान वेतन देण्याची तरतूद केली.

कलम 42 नुसार कामाच्या ठिकाणी आणि न्याय व सुरक्षित आणि प्रसूती सहाय्य देण्याची तरतूद केली.



Kal. Rasika Mahavidyalaya * Deoni * Tq. Deoni Dist. Latur

IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Principal
Kal. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

त्यामुळेच आज स्त्रियांना प्रसूती काळात भरपगारी रजा मिळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या दास्यांचेआणि तिच्या अवनतीचे मूळ शोधून काढले. जातीची जडणघडण आणि स्त्रियांचे शोषण हे एकमेकांशी पूरक असल्याची सैद्धांतिक मांडणीही त्यांनी केली विवाहाचा हक्क महिलांना असावा, स्वत:चा जोडीदार निवडण्याचा हक्क महिलांना असावा, घटस्फोटाचा हक्क महिलांना असावा, विवाहानंतरही आई-वडिलांच्या मिळकतीत स्त्रियांना समान हक्क असावा, त्यांना पोटगी, दत्तक विधान, अज्ञानत्व आणि पालकत्व याचे अधिकार असावेत, स्त्रियांच्या न्याय हक्काचे मार्ग खुले असले पाहिजे म्हणून डॉ. बाबासाहेब कायदेमंत्री असताना 1948 साली संसदेमध्ये हिंदू कोड बिल सादर केले. परंतु कर्मठ पुरुषसत्ताक संस्कृतीला हिंदू स्त्रियांना अधिकार देणे म्हणजे आपल्या अधिकारावर आक्रमण वाटले त्यामुळे संसदेमध्ये डॉ. बाबासाहेबांना कडाडून विरोध झाला त्यामध्ये डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभ भाई पटेल, पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी यांचाही सहभाग तितकाच होता काँग्रेसच्या या निष्ठावंत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या लोकांनी आपल्या सहकाऱ्यांचे मन वळविण्याचा कुठलाही प्रयत्न केला नाही उलट काँग्रेसमधील काही सदस्यांच्या पत्नीने डॉ. बाबासाहेबांच्या या हिंदू कोड बिलाला मोर्चाच्या माध्यमातून प्रखर विरोध केला तसे करण्यात त्यांना या सदस्यांनीच चेतविले होते त्यामुळे डॉ. बाबासाहेबांचा फार मोठा भ्रम निरास झाला होता ज्या हिंदू महिलांसाठी आपण रक्ताचे पाणी केले तब्येत साथ देत नसतानाही त्यांच्या हक्कासाठी वेळ खर्ची घातला पण याच महिलांनी आपल्याला विरोध करावा हे केवढे मोठे दुर्दैव आहे. त्यामुळे ते व्यथित झाले होते एकंदरीत चोहीकडून होत असलेल्या प्रचंड विरोधामुळे हे बिल संसदेमध्ये बहुमता अभावी पास होऊ शकले नाही त्यामुळे नाराज होऊन डॉ. बाबासाहेबांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. पुढे याच बिलाचे टप्प्याटप्प्याने कायद्यात



Kai. Rasika Mahavidyalaya Deoni Tq. Deoni Dist. Latur
Principal
Kal. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur
IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

रूपांतर करण्यात आले. स्त्री म्हणून जिथे जिथे तिथे शोषण होते ते सर्व कालबाह्य नियम, कायदे, प्रथा, परंपरा यांना मूठमाती देण्याचे बळ महिलांच्या अंगी येण्यासाठी जे जे करता येईल ते त्यांनी केले.

स्त्रियांच्या हक्काचा प्रश्न सर्वप्रथम महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्रीय पातळीवर मांडला. 11 नोव्हेंबर 1932 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वतीने संतती नियमनाचे विधेयक मुंबई प्रांत विधीमंडळात पी. बी. रोहम यांनी मांडले.

1938 मध्ये स्त्रीयांना कुटुंबनियोजनाचे महत्त्व पटवून सांगितले. तसेच कोणत्याही कारणासाठी का होईना ज्यावेळी एखाद्या स्त्रीला मूल होऊ देण्याची इच्छा नसेल त्यावेळी तिला गर्भधारणा टाळता येण्यासाठी मुभा असली पाहिजे आणि संतती जन्माला घालणं हे सर्वस्वी स्त्रियांच्या इच्छेवर अवलंबून असले पाहिजे या त्यांच्या विचारांवरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना स्त्रियांविषयी किती तळमळ होती हे दिसून येते.

1942 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मजूरमंत्री असताना त्यांनी 1923 चा कामगारांचा कायदा, नुसकान भरपाईचा कायदा आणि सेवारत कामगार स्त्रियांच्या भरपगारी प्रसूती रजेचा कायदा केला.

खाण कामगार स्त्रियांच्या प्रसूती काळाच्या रजेत व तत्कालीन मिळणाऱ्या मोबदल्याच्या रक्कमेत वाढ केली.

गिरण्या, कारखाने आणि इत्यादी कामाच्या ठिकाणी मजुरी करणाऱ्या स्त्रियांच्या मुलांसाठी पाळणाघर असावी यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न केले.

मुलींची लग्न लवकर करून वैवाहिक जीवन तिच्यावर लादू नका योग्यवेळी मुलीचे लग्न करा असा अनमोल सल्ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना दिला.



Kai. Rasika Mahavidyalaya Deoni Tq. Deoni Dist. Latur

Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

एवढेच नाही तर आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडण्याचा अधिकार मुलींना असावा एवढा उदात्त हेतू डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्त्रिस्वातंत्र्य विषयी होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय सभेचे स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अशा विविध अंगांनी सक्षमीकरण करण्याच्या कार्यातील अग्रणी महामानव आहेत म्हणूनच ते स्त्रीमुक्तीची चे खरे प्रणेते आहेत.

**संदर्भसूची:**


प्रा. गौतम निकम; जातीव्यवस्था आणि पुरुषप्रधानता विमल प्रकाशन, चाळीसगाव.

प्रा. गौतम निकम; प्राचीन काळातील स्त्रियांचा दर्जा, विमलकीर्ती प्रकाशन चाळीसगाव

डॉ. बाबासाहेब आंबेडकर; हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनतीचे, सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे

प्रा. हरी नरके; बाबासाहेबांनी मनुस्मृती तीन वेळा का जाळली? (याचे विश्लेषण करणारा लेख) मॅक्स महाराष्ट्र ने प्रसिद्ध केलेला.


******



Principal
Kai. Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq. Deoni Dist. Latur

IQAC-COORDINATOR
Kai.Rasika Mahavidyalaya, Deoni
Tq.Deoni Dist.Latur

Kai. Rasika Mahavidyalaya * Tq. Deoni Dist. Latur *
Deoni